**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयास "आहरण व संवितरण अधिकारी" तसेच "नियंत्रक अधिकारी" घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक — मलोआ ११२६/ प्र.क्र. ७८/ मलोआ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक — ०६ मे, २०२६

**वाचा —**

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक डीडीओ १४२०/ प्र.क्र. ०१/ २०२३/ रोखशाखा, दिनांक २४ मार्च, २०२६,

२) अधिदान व लेखा कार्यालयाचे पत्र क्रमांक अले/ नियंत्रण/ आयआय/ फा-२३४(२४)/ जा.क्र. १०३०, दिनांक ११ मार्च, २०२६.

**प्रस्तावना —**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना झाल्यापासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय मुंबई येथे स्थानापन्न होते. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून "त्रिशुल गोल्डफिल्ड, प्लॉट क्रमांक ३४, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४" येथे भाडेतत्वावर स्थलांतरीत करण्याचे आदेश दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची नवीन इमारत सी.बी.डी. बेलापूर येथे तयार झालेली असल्याने आयोगाचे कार्यालय कायमचे नवी मुंबई येथेच स्थलांतरीत झालेले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यापूर्वी मुंबई येथे असल्याने त्यांची देयके आहरण व संवितरण अधिकारी, यांचे मार्फत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथेच सादर करण्यात येतात. तथापी आयोगाचे कार्यालय नवी मुंबई येथे स्थलांतरीत झाल्याने अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथून ठाणे जिल्हा कोषागारामध्ये वर्ग करण्याकरीता "आहरण व संवितरण अधिकारी" आणि "नियंत्रक अधिकारी" यांना प्राधिकार प्रदान करण्याबाबत नव्याने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय —**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय नवी मुंबई येथे स्थलांतरीत झाल्याने ठाणे कोषागार कार्यक्षेत्रातील कोकण भवन उपकोषागारात देयके सादर करण्याकरीता महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम १५(३) आणि १५६ मधील तरतूदीनुसार उपसचिव (लेखा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना **"नियंत्रक अधिकारी"** तसेच लेखा अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मागणी क्रमांक ए-०३, ए-०५, जी-०६, ए-०९, ए-१० आणि जी-९९ खालील सर्व उद्दिष्टांमधील देयके कोषागार कार्यालयास सादर करण्यात येतील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे स्वत: आहरण व संवितरण अधिकारी (self DDO) असून ते ०१-वेतन व ११-देशांतर्गत प्रवास खर्च या दोन उद्दिष्टामधून देयके सादर करतील.

०३. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२३/प्र.क्र.८८/२३/कोषा-प्रशा-५, दि. ०३.१०.२०२३ मधील मार्गदर्शक सुचनांचे कटाक्षाने पालन करणे बंधनकारक राहील.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६१/२०२६, कार्यासन-कोषा प्रशा-५, दिनांक २९.०४.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in महाराष्ट्र या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५०६१८२७१३६९०७ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SMITA PRASAD JOSHI

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=d759e39e5163375d3782e5f6bef7edf6a25c72797123cdaa86acd09edf52baf1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=28AA5752FA66D3A7FDEAFB1F4AB24CD90FD9D667A6880CB8CCECA18276150ACA, cn=SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.05.06 18:28:45 +05'30'

**(स्मिता जोशी)**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत —**

१) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
६) कोषागार अधिकारी, ठाणे,
७) कार्यासन - कोषा प्र.५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) कार्यासन - अर्थसंकल्प, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) निवड नस्ती, कार्यासन-मलोआ